राज्यातील शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना त्यांचे मासिक वेतन व भत्त्यांच्या वितरणाबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
शासन निर्णय क्र. डी. डी. ओ. - १००७ / प्र. क्र. ६५ / कोषा प्र - ५
दिनांक: ७ सप्टेंबर, २०११.

संदर्भ:- १) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक टीआरडब्ल्यु १३८८ / प्र. क्र. १३८ /८८ / कोषा प्र - ४, दि. ११ जुलै, १९८८.

२) वित्त विभाग,शासन निर्णयक्रमांक डी. डी. ओ. १००७/प्र. क्र. ६५/कोषा प्र- ५, दि. ८ जून, २००७.

३) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण - १०१० / प्र. क्र. ६८ / कोषा प्र - ५, दि. २३ डिसेंबर २०१०.

शासन निर्णय:-

राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना त्यांचे मासिक वेतन वेळेवर प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला मिळण्यासाठी शासनाने संदर्भाधिन शासन निर्णयाद्वारे उपाययोजना केलेली आहे. वेतन व भत्ते वितरणाची पध्दत अधिक कार्यक्षम करण्यासाठी पुढील सूचना देण्यात येत आहेत.

संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये कोषागारातून आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना होणारी प्रदाने ईसीएस / ईएफटी / एनईएफटी या सारख्या आधुनिक सुविधांचा वापर करुन करण्याबाबतची कार्यपध्दती अंमलात आलेली आहे. त्यामुळे सर्व कोषागार / उप कोषागार व अधिदान व लेखा कार्यालय यांनी वेतन व भत्त्यांची देयके विहित मुदतीत पारीत केल्यानंतर त्याची रक्कम महिन्याच्या शेवटच्या दोन कामाच्या दिवसांपूर्वी (preceding two working days) आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना वितरीत करावी.

आहरण व संवितरण अधिकारी यांनी सुध्दा वेतन व भत्त्यांची देयके प्रत्येक महिन्याच्या पंचवीस तारखेपर्यंत प्रदानाकरीता कोषागारात दाखल करावी, जेणेकरुन सदर देयकांची तपाराणी होऊन त्याचे प्रदान ईसीएस / ईएफटी / एनईएफटी / आरटीजीएसद्वारे महिन्याच्या शेवटी दोन कागाच्या दिवसापूर्वीच करणे शक्य होईल.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा रांगणक संकेतांक २०११०९०७१२०४११००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स. अ. मु. नकवी)
उप सचिव, वित्त विभा

प्रति,
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

मंत्रालयीन सर्व विभाग
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व प्रादेशिक विभाग प्रमुख
प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
गहालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
सह संचालक, लेखा व कोषागारे, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोकण भवन, नवी मुंबई.

प्रबंधक , सर्व अनुदानित कृषि व अकृषि विद्यापीठे,
बहूजन समाज पार्टी, डी-१ इन्ना हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ., बॅरॅक क्रमांक १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई-४
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, परळी, मुंबई-१३
इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस(आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-२५
नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट ,मुंबई-२१
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी [illegible], दादर, मुंबई-२८
सर्व सर्व विधानपरिषद सदस्य / सर्व विधानसभा सदस्य.
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग (कोपा प्र ५)
